माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये**
**प्राप्त झालेले द्वितीय अपील**

**अपील क्रमांक : ५८०/२०२२**

**अपिलार्थी**—सौ. वैशाली दिनेश बडगुजर

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष-१६ (आरागिरणी),**
**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख),नागपूर**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा वनसंरक्षक (वन विनियमन),**
**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), नागपूर**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.०५.२०२४**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **अनुपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्रधीकाऱ्याच्या निर्णयाचा / आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २०.१०.२०२१ | २९.११.२०२१ | २४.१२.२०२१ | १०.०२.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दि. २०.१०.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "राज्यस्तरीय समितीच्या बैठकी घेण्याबाबतच्या नियमावलीची, शासन निर्णय, परीपात्राकांच्या प्रती तसेच काष्ठ उपलब्ध अहवाल संबंधित प्रकरण मा. उच्च न्यायालय, नागपूर येथे प्रलंबित असल्याबाबतच्या संबंधित खटल्याच्या क्रमांक दर्शक कागदपत्रे व सदरचा खटला प्रलंबित असल्याच्या कारणास्तव, समितीच्या बैठका घेण्याबाबत / न घेण्याबाबत ठेवलेल्या टिप्पणीच्या प्रती साक्षांकन करून पुरविणेबाबत", माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, "आपण मागितलेल्या माहितीच्या दस्ताऐवजांच्या २५ पृष्ठांसाठी रु. ५०/- व रु. ४०/- पोस्टल चार्जेस असे एकूण रु. ९०/- डिमांड ड्राफ्ट, मनी ऑर्डर किंवा रोखीने भरणा करावी. जेणेकरून आपण मागणी केलेल्या दस्ताऐवजांच्या छायाप्रती आपणास पुरविता येणे शक्य होईल. तसेच वरीलप्रमाणे माहिती मिळाल्यानंतरही आवश्यकता भासल्यास आपण या कार्यालयातदि. २०.१२.२०२१ रोजी येऊन नस्ती मधील टिपणी

किंवा दस्ताऐवजांची पाहणी करून समाधान करून घ्यावे", असे अपिलार्थीस कळविले. तदनंतर अपिलार्थी यांनी **दि. २४.१२.२०२१** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "अपूर्ण माहिती" असे कारण नमूद करून प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.०२.२०२२ रोजी सुनावणी घेऊन, "अपिलार्थीला राज्यस्तरीय समितीच्या बैठकी घेण्याबाबतच्या नियमावलीची उपलब्ध असलेली माहिती तसेच मा. उच्च न्यायालय, नागपूर येथे प्रलंबित खटल्याच्या क्रमांक दर्शविणारे दस्ताऐवज सुद्धा देण्यात आले आहेत. तसेच दि. २०.०९.२०२१ ची कार्यालयीन टिपणीसुद्धा देण्यात आलेली असल्यामुळे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात आली आहे", असे नमूद करून अपील निकाली काढले आहे.

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे दि. २८.०२.२०२२ रोजी "अपूर्ण माहिती दिली" असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दि. ०३.०३.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दि. ०३.०५.२०२४ रोजी ऑनलाईन पध्दतीने सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष-१६ (आरागिरणी), अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर, श्री. श्रीराम कुळमेथे व्यक्तिश: उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा वनसंरक्षक (वन विनियमन), नागपूर, श्री. नितेश देवगडे व्यक्तिश: उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरून असे निदर्शनास आले कि, अपिलार्थी सौ. वैशाली दिनेश बडगुजर यांनी अपील क्रमांक ५८०/२०२२ यात त्यांना अपेक्षित असणारी माहिती ही जन माहिती अधिकारी, प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे कार्यालयाकडून प्राप्त झाली असुन, प्रस्तुत अपील अर्ज चालविण्यास त्यांनी स्वारस्य नसल्याचे सुचित केलेले आहे. ही बाब लक्षात घेता, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाली असल्याने, प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०३.०५.२०२४**

जावक क्रमांक E902 दिनांक 24 SEP 2024